# आय.एम.ए.चे अनोखेपण : बॅलन्स फॉर बेटर

**श्रद्धा कळंबटे, रत्नागिरी**

डॉ. नाफडे बंधू आणि त्यांचं अनोखेपण यांचं एक समीकरणच बनून गेलंय. दरवर्षी याची उत्सुकता सर्वांना लागून राहते. यावर्षी डॉ. नाफडे बंधू व त्यांची संपूर्ण टीम यांनी महिलादिनाचे औचित्य साधून रत्नागिरीतील २० वर्षांहून अधिक काळ वैद्यकीय सेवा केलेल्या महिला डॉक्टरांचा सन्मान एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने केला. यात प्रत्येक सत्कारमूर्तींच्या वैद्यकीय, कौटुंबिक तसेच वैयक्तिक वाटचालीची चित्रफित दाखवण्यात आली. तसेच प्रत्येकीला १-१ प्रश्न विचारण्यात आला. त्यातून त्यांची कारकीर्दी उलगडली गेली. खरोखरच नाविन्यपूर्ण उपक्रम वाटला.

५० वर्षेसलग वैद्यकीय सेवा देणाऱ्या ज्येष्ठ प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सुनिता चव्हाण यांच्या मते, सर्वांशी मैत्रिपूर्ण संबंध ठेवावेत. कुणाशीही स्पर्धा करू नये. योग्यवेळी आपल्या सेवेतून निवृत्ती घ्यावी. डॉक्टरांचे प्रयत्न, देवाची कृपा व रुग्णांचं मानसिक बळ यामुळे रुग्ण लवकर बरा होण्यास मदत होते. डॉ. गायत्री नरवणे पुण्यासारख्या मोठ्ठ्या शहरातून रत्नागिरीसारख्या छोट्या गावात येऊन सेवा करू लागल्या. ही अत्यंत अवघड गोष्ट होती. कोणत्याच सुखसुविधा त्याकाळी नव्हत्या. परंतु त्यांनी आपल्या प्रेमळ स्वभावाने रत्नागिरीत 'मुलांचे डॉक्टर' म्हणून नावलौकिक मिळवला. डॉ. कल्पना मेहता यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामागे खूपच मेहनत व खडतर प्रवास केलेला आहे. शैक्षणिक संस्थेतही त्यांचा सहभाग आहे. डॉ. कौसल म्हसकर यांनी आपल्या हसतमुख व्यक्तिमत्त्वाने प्रसुतितज्ज्ञ म्हणून नावलौकिक मिळवला. डॉ. माधवी अपराध यांनी ३७ वर्षेसेवा करून अत्यंत क्लिष्ट सर्जरी पार पाडल्या. त्यात १९८४ मध्ये पहिली लॅप्रोस्कॉपी सर्जरी केली. डॉ. माधुरी पेवेकर या हरहुन्नरी महिलेने २७ वर्षेसेवा केली. १२ वेळा रक्तदान केले. अनेक छंद जोपासले. 'आम्ही मुरलेले' नाटकात ६ रोल १।१।। मिनिटांच्या गॅपमधून साकारून अक्षरश: सिक्सर मारली. डॉ. मंगला चव्हाण यांनी भूलतज्ज्ञ म्हणून ग्रामीण भागातून सेवा केली. ऑपरेशन थिएटर म्हणजे त्यांचे माहेरघर जणू! शासकीय उपक्रमांतही त्यांचा सहभाग असे. नवोदित डॉक्टरांनी अनुभवासाठी शासकीय रुग्णालयात जरूर काम करावं असं त्या म्हणतात. डॉ. पूर्णिमा मुकादम यांनी २२ वर्षेसेवा करून वयाच्या ५० वर्षी नृत्याच्या परीक्षाही दिल्या.

डॉ. रत्ना जोशी या मुंबईहून रत्नागिरीत आलेल्या. या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या फॅमिली डॉक्टरांनी २५ वर्षेसेवा केल. झोपडपट्टीतील, तसेच आर्थिक दुर्बलांची कैवारी म्हणून त्या ओळखल्या जातात. पैशापेक्षा गरजूंना वेळेवर सेवा देण्यात त्या धन्यता मानतात. त्यांच्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वामुळे रुग्णांची कोणतीही समस्या त्यांना स्वस्थ बसू देत नाही. यातूनच त्यांनी शेकडो स्त्रियांचे संसार सावरले आहेत. डॉ. संध्या पाटील यांनी ३० वर्षेशासकीय रुग्णालय तसेच मनोरुग्णालयात वैद्यकीय ऑफीसर म्हणून सेवा केली त्यांच्या कारकिर्दीत शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीचा उत्तम कार्याबद्दल गौरव करण्यात आला. त्या सामाजिक कार्यातही सहभागी होतात. अत्यंत मृदू व शांत स्वभावामुळे त्या सर्वत्र लोकप्रिय आहेत. डॉ. सुप्रिया भोळे यांनी प्रसुतितज्ज्ञ म्हणून २५ वर्षेसेवा केली, परंतु काही काळानंतर त्यांनी आपली प्रॅक्टीस बंद करून आपल्या पतीच्या हॉस्पिटलमध्ये मदत करणं पसंत केलं. डॉ. उज्ज्वला कांबळे यांनी ३० वर्षेडेन्टीस्ट म्हणून सेवा केली. ३ वर्षेत्या आय.एम.ए. च्या अध्यक्षा होत्या. त्यांना संगीताची विशेष आवड आहे. डॉ. उज्ज्वला पवार यांनी २३ वर्षेप्रसुतितज्ज्ञ म्हणून सेवा केली. सामाजिक संस्थांच्या त्या सदस्य आहेत. पर्यटनाची आवड असून आपल्या दोन्ही मुलींना त्यांनी इंजिनिअर तसेच पायलट सारख्या पुरुषप्रधान क्षेत्रात उंच भरारी घेण्याची संधी दिली. डॉ. विद्यागौरी भोळे यांनी २२ वर्षेशासकीय रुग्णालय, तसेच चिरायू येथे सोनोग्राफिस्ट, रेडिओलॉजिस्ट म्हणून काम केले.

या सर्व सत्कारमूर्तींचे हार्दिक अभिनंदन! कारण त्यांनी केवळ आपला व्यवसायच केला नाही तर आपलं कुटुंब, आपली मुलं, आपले छंद यांना 'क्वालिटी टाईम' देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.एवढ्यावरच हा कार्यक्रम संपला नाही तर पुरुष डॉक्टर मंडळींनी डॉ. निलेश नाफडे व डॉ. अजित नरवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व महिलांसाठी शाकाहारी, मांसाहारी, पावभाजी स्वत: राबून तयार केली व खावू घातली. आहाहा! महिलांना कोण आनंद झाला. एक दिवस का होईना पुरुषांनी आम्हाला चुलीपासून मुक्ती दिली. तसेच स्वयंपाक करणं किती कष्टप्रद असतं हे मान्य करून त्याचा अनुभवही घेतला. यापेक्षा आगळावेगळा संयुक्तिक महिलादिन कोणता बरं असू शकतो! 'बॅलन्स फॉर बेटर' हे यावर्षी चे घोषवाक्य आय.एम.ए.च्या सर्व सभासदांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले.